**विविध योजनांबाबतची Data Entry ग्रामपंचायत पातळीवर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

**माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः GAD-मतस/२५/२०१३-DIR-DIT(MH)/३९**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १६ सप्टेंबर, २०१३

**संदर्भ:- मा.मुख्य सचिवांनी याबाबत घेतलेल्या बैठका दि.३०.०१.२०१३, २२.०३.२०१३ आणि २३.०४.२०१३.**

**प्रस्तावना —**

राज्यात जवळपास सर्वच प्रशासकीय विभागाच्या विविध कल्याणकारी योजना बहुतांशी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायत/ग्रामपातळीवर राबविण्यात येतात त्यासाठी त्या विभागांना विविध योजनांतर्गत आवश्यक असलेले विविध अहवाल तयार करणे, Data Entry करणे, माहिती संकलित करणे, इत्यादी बाबींसाठी ग्रामपातळीवर सक्षम तांत्रिक यंत्रणा उपलब्ध नसल्याने बऱ्याच गोष्टींमध्ये गावपातळीवर उपलब्ध माहिती कागदांद्वारे तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी पाठविली जाते. त्याठिकाणी बेरीज करुन संगणकावर टाकली जाते. आता ग्रामविकास खात्याने जवळपास २५००० पेक्षा अधिक ठिकाणी संग्राम केंद्रे सुरु केल्यामुळे त्याची Data Entry ची कामे ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायत पातळीवर असलेल्या संग्राम केंद्रामार्फत करुन घेणे सोयीस्कर होईल. याकरिता सदरील बाबीवर मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची बैठक घेण्यात आली व त्या बैठकीत संग्राम केंद्राच्या सेवा इतर विभागांनी वापरण्याबाबता व त्यासाठी इतर विभागांकडून शुल्क आकारण्याबद्दल समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**शासन निर्णय—**

१) सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अंतर्गत गावपातळीवर राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती आवश्यक त्या सॉफ्टवेअरमध्ये भरण्याचे काम (Data Entry) ग्रामपंचायतींतील संग्राम केंद्रामार्फतच करण्यात यावे. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र संगणक परिचालक नेमण्याची आवश्यकता नाही. संग्राम केंद्राचा Data Entry Operator ग्रामविकास विभागाचे काम

सांभाळून ही कामे अतिरिक्त करणार आहे. त्यामुळे त्याच्याकडे दुसऱ्या खात्याच्या कामासाठी वेळ आहे किंवा नाही यासाठी ग्रामविकास विभागाची पूर्वसंमती घ्यावी.

२) संग्राम केंद्रातून Data Entry करण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक ते सॉफ्टवेअर एन.आय.सी., माहिती तंत्रज्ञान विभाग व महाऑनलाईनकडून तपासून घेणे आवश्यक राहील. जेणेकरुन Data Entry च्या कामात सुसूत्रता राहील आणि संग्राम केंद्राच्या Username/Password ची संबंधित खात्याच्या सॉफ्टवेअरशी सांगड घालणे शक्य होईल.

३) प्रमाणित माहिती सॉफ्टवेअरमध्ये अचूक भरणे या मर्यादेतच संग्राम परिचालकाचे काम असेल. सॉफ्टवेअरमध्ये संगणक परिचालकांनी भरलेली माहिती अचूक आहे किंवा नाही याची खातरजमा (Proof Reading) संबंधित विभागाच्या स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांनी करावी.

४) Data Entry साठी संबंधित विभागाला वाजवी शुल्क आकारण्यात येईल. शुल्क आकारणीबाबत प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीकडून निर्णय घेण्यात येईल. या कमिटीमध्ये माहिती तंत्रज्ञान, वित्त विभाग, NIC इत्यादींचा समावेश राहील. याबाबत सविस्तर शासन निर्णय ग्रामविकास विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल.

५) वरीलप्रमाणे ठरल्यानंतर Data Entry चे काम संग्राम केंद्रामध्ये नियुक्त संग्राम परिचालकालाच करावे लागेल. त्यासाठी कोणताही नवीन कर्मचारीवृंद नेमला जाऊ नये. ज्याठिकाणी संग्राम केंद्र चालकाला अगोदरच खूप काम आहे किंवा Data Entry चा Volume जास्त असल्यामुळे त्यांना अतिरिक्त काम करता येणार नाही, अशा वेळी संबंधित खात्यांनी माहिती तंत्रज्ञान विभागाचा सल्ला घेऊन RFP काढून प्रति Entry/प्रति Form च्या Lowest Market Price Rate चा शोध घेऊन गाव/तालुका किंवा जिल्हा यापैकी योग्य स्तरावर ही कामे करुन घ्यावीत.

६) बऱ्याचवेळा Data Entry Accuracy अतिशय संवेदनशील (critical) असते (उदा. ७/१२ चा जुना डेटा). अशा कामांसाठी Professional Companies कडून Double blind data entry सारख्या methods चा उपयोग करावा लागेल. अशा वेळीही माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सल्ल्याने RFP तयार करुन Open transparent tender काढले पाहिजे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९१६११४५३९५५११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aggarwal Rajesh Madanlal

Digitally signed by Aggarwal Rajesh Madanlal
DN: CN = Aggarwal Rajesh Madanlal, C = IN, S = Maharashtra, O = Govt of Maharashtra, OU = Directorate of Information Technology
Reason: I am approving this document
Date: 2013.09.16 17:23:02 +05'30'

**(राजेश अग्रवाल)**

सचिव (माहिती तंत्रज्ञान)

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
५. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
७. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
८. सचिव, राज्य निवडणूक आयोग (पत्राने),
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१०. सचिव, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई (पत्राने),
११. सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई (पत्राने),
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व अनुज्ञेयता), नागपूर

१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर

१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

१८. मुख लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,

१९. सर्व विभागीय आयुक्त,

२०. सर्व जिल्हाधिकारी,

२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२२. सा.प्र.वि. कार्यासन-३९

२३. सर्व मंत्रालयीन विभाग,

२४. निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख